International Journal of Researches in Social Science and Information Studies (IJRSSIS)
September 2013
Issue-1, Volume-1
Online Journal
ISSN No. 2347-8268

# बाबा मोहोड यांच्या काव्यातील निसर्गदर्शन : एक आस्वाद

वैशाली सुरकार
शिक्षक कॉलनी, तकीया वार्ड,
भंडारा.

## सारांश :–

बाबा मोहोड हे विदर्भातील शेतीनिष्ठ साहित्यीक होवून गेले. कुठलाही साहित्यीक साहित्य सृष्टीमध्ये प्रवेश करतांना काव्य लेखनापासून सुरूवात करतो असे म्हटले जाते. बाबा माहोड यांचे बाबतीतही नेमके तेच घडले. शाळेत शिकत असतांना चारोळी लिहिता लिहिता चांगल्या प्रतीचे काव्यलेखन बाबा मोहोड यांच्याहातून होवू लागले. प्रथम लिहिलेली कवीता स्वतःच वाचून फाडून टाकणे व पुन्हा त्यात बदल करून लिहिणे असे करता करता विदर्भातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील ज्येष्ठ व थोर साहित्यिकांच्या पसंतीस बाबा मोहोड यांचे काव्य यायला लागले.

प्रस्तुत संशाधन लेखामध्ये बाबा मोहोड यांनी लिहिलेल्या पायवाट व विराम या काव्यसंग्रहातील निसर्गविषयक कवीतांचा आढावा घेवून त्यांचा आकलनपर अभ्यास करण्यात आलेला आहे. मुख्यत्वे त्यांच्या प्रस्तुत कवीतांमध्ये निसर्गातील घटक जसे – आकाश, वारा, पाऊस, तारे, वृक्ष यांचा सहवास व बाबा मोहोड यांना आलेली प्रचीती यांचे आकलन घडते.

## बाबा मोहोड यांच्या 'पायवाट' काव्यसंग्रहातील निसर्गदर्शन :–

'पायवाट' या काव्यसंग्रहातील पहिली कविता 'पायवाट' आहे. एकुण 60 कविता असलेल्या या संग्रहातील कविता वेगवेगळया विषयांना अलगदपणे स्पर्श करणाऱ्या आहेत. प्रामुख्याने यात बाबा मोहोड यांनी निसर्ग, प्रेम, विरह, दुःख, वेदना, समाजाचे वास्तव दर्शन भीषण सत्य वर्तविणाऱ्या घटना, नातेसंबध या विषयांना हात घातलेला आहे.

'पायवाट' या काव्यसंग्रहातील पहिली कविता 'पायवाट' यामध्ये बाबा मोहोड यांनी रानावनातून जाणाऱ्या पायवाटेचे वर्णन केले आहे. रात्रीच्या मंद चंद्रप्रकाशात पायवाटेचे खुललेले सौंदर्य बाबांनी आपल्या लेखणीने टिपले आहे ते म्हणतात;

चांदण्याचे निःश्वसित
ओथंबले तृणावर
आणि रातराणीवर


A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

फुले चंदेरी बहर (पृ.15)

अशातच पायवाटेचे दु:ख ही त्यांनी मांडले.

'पाचोळयांच्या शय्येवर
तेज सांडती काजवे
थकलेली पायवाट
ढाळी स्वपनात आसवे (पृ.15)
वक्षावर उठलेले
पथिकांच्या पाऊलांचे
व्रण कधी प्रभुराया
आहेत हे मिटायचे' (पृ. 15)

यातून कवी पायवाट ही निसर्गातील मृत घटक नसून सजीव आहे, तिलाही मन संवेदना आहेत असे सांगतो आहे. यातून कवीची संवेदनशीलता, हळवेपणा, सूक्ष्मनिरीक्षणक्षमता जाणवते. याचबरोबर 'कोवळा अकुंर' या कवितेत बाबा मोहोड यांनी पाऊस पडल्या नंतर जमिनीवर उगवलेल्या कोवळया अकुंराचे वर्णन केले आहे. हा अकुंर आशेची नवी किरणे घेऊन आला आहे असे सांगतात व ते म्हणतात.

'अंकूर कोवळा
मायावी जगात
आंकाक्षा उमले
तयाची गंधात'........ (पृ 17)

हा अंकुर थकल्या भागल्या जीवाला कसा उत्साह देतो हे पुढील ओळीवरून स्पष्ट होते.

कोवळया अंकूरा
तूच रे विसावा
थकल्या भागल्या जीवा
व्यथेत हासते तुझे ते जीवन
त्याचेच करीन
नेहमी पुजन (पृ 17)

दुःख कितीही असले तरी तुझ्या कोमलतेमुळे माझी व्यथा विसरून जाईल हे कविला इथे मांडायचे आहे हे जाणवते.

पुढे 'सावली' या कवितेत तर बाबा मोहोड यांनी सावलीचे महात्म्य वर्णन केले आहे. उन्हाच्या प्रखर तडाख्यात सर्व जण सावलीच्या शोधात असतात. निसर्गातील सर्व घटकामधे तिचे महात्म्य वेगळेच आहे. दुपारी तिच्या कुशीत असंख्य पशुपक्षी विसावतात पण सांयकाळी सावली ची दिवसभराची तपस्या फळते व ती विसावते, सुखावते सुध्दा, हे खालील त्यांच्या काव्य रचनेवरून सहज समजते.

फांदीच्या गर्भात
कोवळी पालवी
..........पंखाच्या उबेत
पेंगली पाखरे............
जागले जीवन
फुलल्या मोहर
रानात नाचली
गंधाची लहर
फळली तपस्या
वेदना मिटली
बुंध्याच्या कुशीत
सावली हसली. (पृ.26)

'गुढ्याा तोरणे उभारू' या कवितेत कविने पृथ्वीचे वर्णन करतांना मुक्तहस्ते कौतुकांचा वर्षाव उधळलेला आहे. ते म्हणतात,

'तारकांनी फुललेल्या
परिजातकाच्या वर
कुणी तरी फेकियला
विषृववृत्ताचा दोर'
'आज आहे त्या सतीचा
वाढदिवस मंगल
गुढयातोरणे उभारू
आणि भूषवू भुतल' (पृ.28)

'ये पखांनी तोडित पाणी' या कवितेत बाबा मोहोड यांनी पर्जन्यदेवतेस एक आर्त हाक दिली आहे.

'ये पखांनी तोडित पाणी
सागरातले निळया नभाच्या
मिटव वेदना दयाधना हे
व्याकुळलेल्या मानवतेच्या' (पृ.32)

पुढे याच कवितेत मानव जातीच्या वेदना पर्जन्यदेवतेस कथन करतात व म्हणतात.

झोपडीत रंकाच्या तुटक्या
मुखदुर्बल आत्म्यांची सेना
कन्हते, रडते करिते क्रंदन
ये मिटवाया त्यांची दैना' (पृ.32)

'मातीची आंकाक्षा' या कवितेत मातीचे आत्मनिवेदन पुढील काव्यपंक्तीत मोहोडांनी मांडले,

युगायुगाची भिजलेली मी माती
कुजले जीवन माझे................
बीजलीने मज दिधला उजळा
वर्षेने मज केले चिंब
ताप दिला ग्रिष्माने
प्रितीही मिळाली मला वसंताकडुन........(पृ.33)

त्यानंतर 'शुक्राची चांदणी' या कवितेत शुक्राची चांदणी चे वर्णन टिपले तर 'प्रीत' या कवितेत पिंपळ वृक्षाचे जीवनदर्शन घडविले व 'घन उन्हाचे वर्षती' या कवितेत ग्रिष्मकाळात ही निसर्गाचे सौदर्य खुलून दिसते हे सांगतात. तर 'आता' या कवितेत मृगनक्षत्राच्या पाऊसामुळे होणाऱ्या निसर्ग बदलाची व सौदर्याची ते दखल घेतात. एकुणच बाबा मोहोड यांनी निसर्गातील विविध घटक रानातली पायवाट, उगवलेला कोवळा अंकूर, पृथ्वी, पर्जन्य, माती, तारे, वृक्ष, नक्षत्र यांना त्यांच्या कवितेत स्थान दिले आहे.

'पायवाट' या काव्यसंग्रहातील 'कमाई' नावाची शेवटची कविता आहे. यामध्ये कवी बाबा मोहोड यांनी या भूमातेशी आपली नाड किती मजबुतपणे जुळलेली आहे यांचे

आत्मविश्वासात्मक वर्णन केले आहे. या भूमातेसाठी घामाचे अत्तर लावीन व तिला हिरवा शालू ल्याने हीच माझी खरी कमाई समजेन असा दृढ आत्मविश्वास यात वर्णन केला आहे.

## बाबा मोहोड यांच्या 'विराम' काव्यसंग्रहातील निसर्गविषयक कविता :

बाबा मोहोड यांच्या कवितेला विविध पदर आहेत. निसर्गातील अनेकविध सौंदर्यस्थळे त्यांच्या कवितेत डोकावतात. त्यांचे मनोहारी चित्रण मनाचा ठाव घेणारे आहे. ग्रामीण जीवनातील भावविश्व मार्मिकपणे ते अधोरेखीत करतात. 'पाऊस' हा अनेक कवींच्या लिखाणाचा विषय बाबा मोहोड यांचा 'पाऊस' काही वेगळा आहे. पावसाविषयीची तक्रार करताना त्या तक्रारीत चिंतनाचे सूर उमटतात. पाऊस न आल्याने समाजजीवन कसे विस्कळीत होऊन जाते याचा अनुभव कवीच्या पाठीशी आहे. ते म्हणतात,

''अजूनी न आली बाई
कशी पावसाला जाग
अजूनी न गेला बाई
मेला वैशाखाचा राग '' (पृ. 17)

कवी कितीदा तरी पावसाला साद देतो पण प्रत्येकच वेळी तो निराश करतो. कवी पावसात भिजण्यासाठी अधीर झालाय म्हणून तो म्हणतो–

''सोसवेना धीर आता
असहय हे रितेपण
मला व्हायचे सुगंधा
तुझ्या सरीत भिजून!'' (पृ. 17)

प्रतीक्षेनंतर जेव्हा पाऊस येतो आणि धरती आंघोळ करते त्यावेळी कवीच्या आनंदाला पारावारच राहत नाही. निसर्गातल्या घटकांना कमालीचा आनंद होतो. पावसाच्या स्वागताला आकाशात नागमोडी आकारात वीज तयार आहे. निळया निळया प्रकाशाचे पीस डोईत खोवून शुक्रतारा आपला आनंद व्यक्त करतो. निसर्गातल्या बदलाचे चित्रण कवी अचूकपणे टिपतात. कवीला सौदर्यदृष्टी असल्याचा आपल्याला प्रत्यय येतो आकाशातील ग्रहताऱ्यांचा अचूक वापर कवितेत करतात आणि कवितेचे सौंदर्य वाढवितात. पाऊस येण्याचे आधी निसर्ग संसूचन करीत असते. एकदम पाऊस येत नाही. आकाशातील, निर्सगातील बदल आपणास जाणवू लागतात. प्रचंड वेगवान हालचाली होतात, मग पाऊस

येतो. त्याचे बारकाव्यानिशी चित्रण कवी 'गर्द सावळया घनांनी' या कवितेत करतो. आषाढ घनांनी गगन झाकल्याचे पाहून जमीन मोहरून उठते. कवी ते वर्णन करताना निसर्गमय होऊन जातात. त्या कवितेतील नायिका म्हणते

"माझी मी एकटी
अशातही पण
घेईन श्रावण
सोबतीला!" (पृ. 33)

श्रावणाची सोबत तिच्या एकटेपणात वसंत फुलवितो त्याचे नयनरम्य वर्णन कवी करतात. त्यांच्या कवितेला मातीचा गंध लाभलेला आहे. म्हणूनच कवी मायमातीची भूपाळी गातो. त्यांची कविता आकाराने छोटी असो वा मोठी ती अमावश्येच्या रात्रीतील आकाशासारखा भव्य किंवा दवबिंदूतून फेकल्या जाणाऱ्या रंगसंगतीसारखा चिमुकला पण सुंदर अनुभव देवू शकतो. दोन कडव्याची 'मिटेल आकाशाचा डोळा' ही कविता यासाठी उदाहरणादाखल दाखविता येईल.

"हवेत भरले रंग धुक्याने
अजुन झोपले नाही अंबर
हिरवळ झाली चिंब दवाने
प्राजक्ताचा खचला मोहर" (पृ. 66)

पाऊस हा कवीचा आत्यंतिक आवडता विषय 'पृथ्वीचे गाणे' मधील तरूणी हुबेहुब उभी करण्याचे काम कवी करतात. निलाजऱ्या पावसांन तिची नवथर काया कशी भिजविली याचे वर्णन ते करतात. ते म्हणतात,

"सरीवर सर येई
अंगी संचरे उल्हास
बीजाबीजाच्या गर्भात
प्रीत येई बहरास." (पृ. 71)

कवीला अस्सल व भावोत्कट प्रतिभेचे लेणे लाभले आहे. त्यांच्या शब्दातून नाजूकपणा, हळुवारपणा, भावनेचा ओलाचा वारंवार जाणवतो. त्यांची कविता प्रौढ आणि म्हणूनच परिपक्क आहे. त्यांची प्रतिभा टवटवीत आणि प्रसन्न आहे. त्यांच्या अंतःर्मनातील भावभावनाचे सुंदर असे प्रकटीकरण त्यांच्या निसर्गविषयक कवितेत पाहायला मिळते.

निसर्गाशी कवी तादात्म्य पावले की काय असेच आपल्याला वाटत राहते. 'हे रिमझिम वर्ष' ही कविता अप्रतिम साकारली आहे. ते म्हणतात,

''मेघांतुनि झरझर झरल्या जीवन–धारा
भिजल्या छायेवर निजला उन्मनवारा
ओणवली पाती हिरवीगार तृणाची
विखुरली वेचण्या जल मोत्यें भुवरची'' (पृ. 72)

यातील 'निजला उन्मन वारा' ही प्रतिमा अप्रतिम आली आहे. कवितेतला सहजपणा अजून त्या कवितेत सौंदर्य ओतत जातो. हीच कविची ताकद आहे. 'आल्या पावसाच्या धारा' या कवितेतील पाऊस आल्हाददायक आणि आश्वासक असा आला आहे. 'झाला पहाट प्रहर', 'दवात भिजले' याही कविता विलक्षण आशयघन आणि मनोहारी आहेत. सर्वात महत्वाची असते ती कवितेची भाषा. त्या भाषेला तिचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व असते आणि भाषा ही कवितेला घडविते. या कविला आपली भाषा आपल्यापासून वेगळी कराविशी वाटत नाही. ती ओल्यामातीसारखी त्याच्या कवितेला चिकटलेली असल्याने त्या ओल्यामातीचे जागतेपण त्यांच्या बऱ्याच निसर्गकवितेत सहजपणे आले आहे. ग्रामीण जीवन जाणिवेच्या, शेतीविषयक, मातीविषयक भावनेच्या नानाविध घटा त्यांच्या कवितेत पाहायला मिळतात. इथल्या भूमीशी त्यांचे आई–मुलाचे नाते असल्याचे जाणवते.

शेतीत घडत जाणाऱ्या एखाद्या घटनेतून तिथली व्यवस्था उभी होणे ही कृती कवीकडून नकळतपणे झालेली असते म्हणूनच ती प्रभावी असते. या पध्दतीने कवी आपल्या लोकसंचिताशी आणि समकालीन वास्तवाशी थेटपणे जोडला जातो. 'भूमीवर ये', 'शुक्राची चांदणी' याही कविता त्यातील आध्यात्मिक जाणिवांमुळ सहजसुंदर झाल्या आहेत.

## संदर्भ टिपा :

1. काळे अक्षयकुमार, 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन', बनहट्टी प्रकाशन, धंतोली नागपूर, 1 ली आवृत्ती, 1999.
2. रसाळ सुधीर, 'कविता आणि प्रतिमा', मौज प्रकाशन, मुंबई, 1 ली आवृत्ती, 1982.
3. डहाके वसंत आबाजी, 'कवितेविषयी', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, 1 ली आवृत्ती, 1999.

4. जोग रा. श्री. व अन्य, 'अर्वाचीन मराठी साहित्याचा चिकित्सक आढावा', प्रदक्षिणा खंड पहिला, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे 1976.

5. सार्वजनिक वाचनालय नाशिक, 'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा', प्रदक्षिणा खंड 2 रा, प्रकाशन पुणे, 1991.

6. मोहोड बाबा, 'पायवाट', वंदन प्रकाशन, अमरावती, 1957.

7. मोहोड बाबा, 'विराम', वंदन प्रकाशन, अमरावती, 2 री आवृत्ती, 1997.